स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

NATIONAL SERVICE SCHEME

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२४–२५/११६ दि. १०/०७/२०२४

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता मतदार नावनोंदणी अभियान राबविण्याबाबत

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व मा. जिल्हाधिकारी, पुणे यांच्या पत्रानुसार दि. ०१ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा दुसरा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर झालेला आहे.

त्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयामध्ये दि. ०९ ऑगस्ट २०२४ पर्यंत नव युवा मतदार नोंदणी अभियान राबविण्यात यावे. अधिक माहितीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे ही, विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

अधिक माहितीकरिता : मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे पत्र

SVEEP

उत्सव निवडणुकीचा अभिमान देशाचा

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १३, पुणे यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बि विंग, पुणे - १
इमेल आयडी - slaopune१३@gmail.com

---

क्र. उभूसंक्र. १३/आस्था-१/कावि/ 03 /२०२४ दिनांक - ४/०७/२०२४

<u>निवडणूक तात्काळ</u>

प्रति,

१. मा. कुलगुरू
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

२. सह संचालक
उच्च शिक्षण, पुणे विभाग,
१७, आंबेडकर रोड, कॅम्प
पुणे-१७

३. विभागीय सह संचालक तंत्र शिक्षण
पुणे विभाग

४. शिक्षण अधिकारी
पुणे महानगरपालिका, पुणे

५. शिक्षण अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपलिका, पिंपरी

६. शिक्षण अधिकारी
जिल्हा परिषद, पुणे

**विषय:- आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
महाविद्यालयांमध्ये मतदार नावनोंदणी अभियान राबविणेबाबत
संदर्भ:- संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र क्र. पीईई-/कावि/८२९/२०२४
दि. २१/०६/२०२४

मा. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. २३/२०२३ ERS(Vol III) दि. २०/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये दि. ०१/०७/२०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार यादीचा दुसरा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर झालेला आहे. त्या अनुपंगाने आपले अधिनस्त पुणे जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये दि.०१/०७/२०२४ पासून नव युवा मतदार नोंदणी अभियान घेण्यात यावे.

सदर कार्यक्रमांतर्गत दि, २५/०६/२०२४ ते ०९/०८/२०२४ या कालावधीमध्ये मतदार म्हणून व्यक्तीचे मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, स्थलांतरित असलेस त्यांची नावे वगळणे, नावामध्ये/पत्यामध्ये दुरुस्ती करणे, मतदान केंद्र बदलणे इत्यादी स्वरुपाची कामे केली जाणार आहेत.

सदर कार्यक्रमांतर्गत विधानसभा निवडणुकीसाठी वापरण्यात येणारी प्रारूप यादी दि. २५/०७/२०२४ रोजी जाहीर होणार असून, सदर यादीत नावे नसलेल्या मतदारांनी नाव समाविष्ट करणेकरिता नमुना नं ६ अर्ज करणे. मतदाराच्या नावात दुरुस्ती वा इतर बदल करावयाचे असल्यास नमुना नं ८ अर्ज भरणे व मतदारांची कायमस्वरूपी स्थलांतरित मतदारांची नावे वगळणेकरिता नमुना नं ७ चा अर्ज भरणे याकरिता दि. ०९/०८/२०२४ ही अंतिम दिनांक निश्चित करण्यात आली असून या कालावधीत प्राप्त होणाऱ्या अर्जांवर नियमोचीत कार्यवाही करून अंतिम मतदार यादी दि. २०/०८/२०२४ रोजी प्रसिद्ध होणार आहे.

नव युवा मतदार नोंदणी अभियान संबंधित विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणीअधिकारी/सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांच्याशी समन्वय साधून कार्यक्रम राबविण्यात यावे. जिल्ह्यातील १८-१९ या वयोगटातील युवकांची संख्या व मतदार नोंदणी झालेल्या युवकांची संख्या यामध्ये मोठ्याप्रमाणावर तफावत दिसून येत असल्याने सदर नव युवा मतदार नोंदणी अभियान यशस्वीपणे व प्रभावीपणे राबविणेकामी विशेष प्रयत्न करण्यात यावेत. तसेच मतदार नोंदणी अभियानाचा दैनंदिन अहवाल सोबतच्या spreadsheet मध्ये नोंदविण्यात यावा.

(डॉ. सुहास दिवसे)
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे

प्रत:-उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांचेकडे माहितीसाठी.